संक्षिप्त् फौजदारी खटला क्र. ६५१४/२०२४

नि.क्र. २९

महाराष्ट्र सरकार वि. कुमार फलके

**आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन.**

| | |
|---|---|
| **आरोपीचे नाव –** | **कुमार दादाभाऊ फलके,** |
| **वय –** | ३८ वर्षे, |
| **व्यवसाय –** | शेती, |
| **राहणार –** | निमगाव वाघा, ता.जि.अहमदनगर. |

प्रश्न –१ तुम्ही सरकार पक्षाचा पुरावा ऐकला आहे काय ? तो तुम्हाला समजला का ?

उत्तर – होय.

प्रश्न –२ सरकारपक्षातर्फे सा.क्र.१ राजेंद्र भागुजी पालवे यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक १९.०५.२०२४ रोजी निमगाव वाघा येथे घटना घडली. त्यांना हवालदार खंडेराव शिंदे यांनी पोलीस ठाण्यात बोलाविले होते. त्याठिकाणाहुन ते खाजगी वाहनाने निमगाव वाघा येथे गेले. त्याठिकाणी एक इसम भिंतीच्या आडोशाला अवैध हातभट्टी दारु विक्री करत होता. त्यांची चाहुल लागताच तुम्ही पळुन गेला. याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ?

उत्तर – खोटे आहे.

प्रश्न –३ सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्याठिकाणी त्यांनी गावठी हातभट्टी दारू २०० लिटर आणि १५ लिटर दोन प्लास्टीकचे ड्रममधुन जप्त केली. त्याची अंदाजे किंमत रूपये १५,०००/-. त्यातुन १८० मि.ली.ची एक बॉटल सिल करुन त्याप्रमाणे पंचनामा केला. उर्वरित मुद्देमाल जागीच नाश केले. दिनांक १९.०५.२०२४ रोजीचा पंचनामा नि.१२ वर त्यांची सही आहे. पंचनामा किती वाजता केला हे मला आठवत नाही. याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ?

उत्तर – खोटे आहे.

प्रश्न –४ सरकारपक्षातर्फे सा.क्र.२ जालींदर मुरलीधर माने यांच्या पुराव्यात असे आले आहे की, घटना ही दिनांक १९.०५.२०२४ रोजी निमगाव वाघा येथे घडली. त्यावेळी ते, सहा.फौजदार भाऊसाहेब काळे, हे.कॉ.ए.सी.लोटके असे नगर

तालुका पोलीस स्टेशन हद्दीत अवैध व्यवसायावर कारवाई करण्यासाठी पेट्रोलींग करत होते. भाऊसाहेब काळे यांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली की निमगाव वाघा येथे एक इसम गावठी हातभट्टीची दारू तयार करत आहे. याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ?

उत्तर – हे खोटे आहे.

प्रश्न –५ सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्यानंतर ते नगर तालुका पोलीस ठाण्यास येथे जावुन हे.कॉ.खंडेराव शिंदे आणि रेपाळे यांना त्याबाबतची माहिती सांगितली. त्यांनी एल.सी.बी.ऑफीसमध्ये दोन पंच बोलावुन घेतले. त्यानंतर ते खाजगी वाहनाने निमगाव वाघा येथे गेले आणि छापा टाकला. त्याठिकाणी त्यांना एक इसम दिसला. तो हातभट्टीची दारू तयार करत होता. त्याला ताब्यात घेवुन त्याचे नाव गाव विचारले असता तुम्ही तुमचे नाव कुमार दादाभाऊ फलके, वय ३५ वर्षे असे सांगितले. छापा टाकला ते ठिकाण तुमच्या घराच्या पाठीमागे होते. याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ?

उत्तर – हे खोटे आहे.

प्रश्न –६ सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, साधारणत: तुमच्या ताब्यात ३०० लिटरचे कच्चे रसायन मिळुन आले आणि ३५ लिटर तयार गावठी हातभट्टी दारू मिळुन आली. त्याची अंदाजे किंमत रूपये १८,५००/– होती. त्यातुन दोन १८० मि.ली.च्या काचेच्या बाटल्या रासायनिक तपासणीकरिता रसायन वेगळे काढले. उर्वरित मुद्देमाल जागीच नाश केला. याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ?

उत्तर – हे खोटे आहे.

प्रश्न –७ सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, वेगळे काढलेल्या रसायनाच्या बाटल्या पंचांसमक्ष बंद करून त्यावर गुन्हयाबाबत माहिती असलेले कागदी लेबल चिटकवले आणि लाखसिल बंद केले. पंचांसमक्ष

दिसत्या परिस्थितीचा माझे समक्ष पंचनामा तयार केला. त्यानंतर पोलीस ठाण्यात येवुन तक्रार **नि.क्र.१५** दिली. छापील एफ आय आर **नि.क्र.१६** दाखविण्यात आली. याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ?

उत्तर – हे खोटे आहे.

प्रश्न –८ सरकारपक्षातर्फे सा.क्र.३ भिमाबाई भाउ रेपाळे यांच्या पुराव्यात असे आले आहे की, गुन्हा घडला त्यावेळी त्या महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल या पदावर नगर तालुका पोलीस ठाणे येथे कार्यरत होते. घटना ही १९.०५.२०२४ रोजीची आहे. मला सदर गुन्हयाचा तपासाचा आदेश **नि.क्र.२१** दिनांक १९.०५.२०२४ रोजी मिळाला होता. तो आदेश प्रकरणात दाखल आहे. त्यावर सहा.फौजदार गुंजाळ यांची सही आहे. याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ?

उत्तर – हे खोटे आहे.

प्रश्न –९ सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्यादिवशी ते आणि, पो हे कॉ खंडेराव शिंदे हे पोलीस ठाण्यात हजर असतांना सहा फौजदार भाऊसाहेब काळे यांना गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, निमगाव वाघा शिवारातील तुम्ही कुमार फलके निमगाव शिवारात त्याचे घराच्या पाठीमागे गावठी हातभट्टी दारू तयार करत होता. त्यानंतर सहा फौजदार भाउसाहेब काळे यांनी स्थानीक गुन्हे शाखा येथे पंचांना बोलावुन घेवुन आणि त्यानंतर ते सर्व पोलीस कर्मचारी आणि दोन पंचां घेवुन छापा टाकण्यासाठी निमगाव वाघा येथे गेलो. त्यांनी १६.३० वाजता तेथे छापा टाकला. याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ?

उत्तर – हे खोटे आहे.

प्रश्न –१० सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्याठिकाणी त्यांना तुम्ही मिळुन आले. तुम्हाला पकडुन तुमचे नावगाव विचारले असता तुम्ही तुमचे नाव कुमार दादाभाउ फलके असे सांगितले. सदर घटनास्थळाची पो कॉ

खंडेराव शिंदे यांनी पंचांसमक्ष झडती घेतली. त्याठिकाणी गावठी हातभट्टी दारूचे ३०० लिटर कच्चे रसायन दोन प्लॅस्टीकच्या बॅरेलमध्ये आणि ३५ लिटर गावठी हातभट्टीची दारू मिळुन आली. त्याची अंदाजे एकुण किंमत १८,५००/– होती. पो कॉ खंडेराव शिंदे यांनी पंचांसमक्ष पंचनामा केला. याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ?

उत्तर – हे खोटे आहे.

प्रश्न –११ सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्यातुन गावठी हातभट्टी तयार करण्याचे रसायन व गावठी हातभट्टी दारू एक एक बाटली १८० मि ली ची सिलबंद करून रासायनिक तपासणीकरता जप्त केली. मुद्देमाल जागीच नाश केला. त्यानंतर पो.कॉ. माने यांनी आरोपीविरूध्द फिर्याद नि.क्र.१५ दाखल केली. त्यावर फिर्यादी आणि ठाणे अंमलदार यांची सही आहे. छापील एफ आय आर वर फिर्यादी आणि ठाणे अंमलदार यांची सही आहे. पंचनामा नि.क्र.१२ वर त्यांची आणि पंचांच्या सहया आहेत. याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ?

उत्तर – हे खोटे आहे.

प्रश्न –१२ सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, प्रकरणात दैनिक अहवाल दाखल केलेला आहे त्यावर ठाणे अंमलदार यांची सही आहे. त्याला **नि.क्र.२२** देण्यात आली. त्यांनी तपासा दरम्यान साक्षीदार भाऊसाहेब काळे आणि अतुल लोटके यांचे जबाब नोंदवले. मुद्देमाल पावती **नि.क्र.२३** वर त्यांची आणि मुद्देमाल कारकुनाची सही आहे. रासायनिक विश्लेषणाकरिता नमुना पाठविल्याबाबतचे पत्र **नि.क्र.२४** प्रकरणात दाखल आहे. त्यावर त्यांची आणि सहा पो निरक्षक यांची सही आहे. याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ?

उत्तर – हे खोटे आहे.

प्रश्न –१३ सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्यांनी मुद्देमाल

घेवुन जाणाऱ्या पो कॉ सागर मिसाळ यांचा जबाब नोंदवला. रासायनिक तपासणीकरता पाठविलेल्या पत्राची पोहोच **नि.क्र.२५** दाखविली. आरोपीस कलम ४१ अ फौजदारी प्रक्रीया संहितेनुसार दिनांक २०.०५.२०२४ रोजी नोटीस **नि.क्र.२६** ची बजावणी केली होती. आरोपीला दोषारोप दाखल करतेवेळी न्यायालयात हजर राहण्याबाबत समजपत्र **नि.क्र.२७** दिले होते. ते प्रकरणात दाखल आहे. तपासा अंती आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्याचेविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ फ आणि ई नुसार दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ?

उत्तर – हे खोटे आहे.

प्रश्न –१४ वरिल साक्षीदार हे तुमचेविरूध्द का सांगत आहेत ?

उत्तर – माहित नाही.

प्रश्न –१५ तुम्हाला शपथेवर जबाब द्यायचा आहे काय ?

उत्तर – नाही.

प्रश्न –१६ तुम्हाला बचावासाठी साक्षीदार तपासायचे आहेत काय ?

उत्तर – नाही.

प्रश्न –१७ तुम्हाला केसबद्दल आणखी काही सांगायचे आहे काय ?

उत्तर – खोटी केस केली.

---------

आरोपीची सही

समक्ष

सही/–

(माधुरी रा. खनवे)

दिनांक १२/०२/२०२६

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
कोर्ट नं.०४, अहमदनगर

संक्षिप्त् फौजदारी खटला क्र. ६५१४/२०२४
नि.क्र. २९
महाराष्ट्र सरकार वि. कुमार फलके

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, आरोपीचा वरील जबाब हा माझे उपस्थितीत घेण्यात आलेला असुन त्यातील सर्व मजकुर आरोपीने सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे.

समक्ष

सही/-

(माधुरी रा. खनवे)

दिनांक १२/०२/२०२६

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
कोर्ट नं.०४, अहमदनगर